मूल्यवर्धन

# प्रेरणा

महाराष्ट्र संवादपत्र ४ : ऑक्टोबर ते डिसेंबर २०१९




## मूल्यवर्धन विषयी बोलू काही



मूल्यवर्धन हा संविधानातील मूल्यांवर आधारित मूल्यशिक्षणाचा कार्यक्रम असल्यामुळे राज्यातील आणि देशातील विविध प्रकारच्या समूहांना स्वीकारण्यायोग्य आणि वादातीत ठरला आहे. मूल्यवर्धन कार्यक्रम हा सहयोगी अध्ययनपद्धती, खेळ, उपक्रम आणि मनमोकळ्या संवादातून आणि सहविचारातून मुलांना हळुवारपणे मूल्यांविषयी सचेतन आणि सक्रिय करण्याचा कार्यक्रम आहे. त्यामुळेच शब्दाभोवती घुटमळणारे मूल्यशिक्षण आता शब्दापलीकडे जाऊन अपेक्षित परिणाम साधण्यात यशस्वी ठरत आहे.

स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, ही मूल्ये समाजातील नातेसंबंध सुसंवादी राखण्यासाठी आवश्यक आहेत. हा सामाजिक विचार असला तरी त्याचा प्रारंभ स्वतःची ओळख म्हणजेच स्व–जाणीवेपासून होतो. स्वतः चे विचार आणि भावना यांच्या निरीक्षणातून आपण दुसऱ्याचे विचार, भावना जाणू शकतो हे मानसशास्त्रीय तत्व लक्षात घेऊन उपक्रमरचना आणि त्यांचा क्रम यांची योजना यामध्ये केली आहे. उपक्रमातील स्व–जाणीव आणि त्यातून स्वतःच्या आयुष्याचे व्यवस्थापन हा सर्वच लहान थोरांसाठी आवश्यक असणारा भाग असून तो दैनंदिन अध्ययन अध्यापनात कसा आणता येईल याची दिशा मूल्यवर्धन साहित्यातून आपल्याला मिळते.

हा कार्यक्रम अभ्यासक्रम रचनेसाठी देखील उपयुक्त ठरला आहे त्यामुळे शिक्षक, मुले आणि अधिकारी यांनी हा कार्यक्रम स्वीकारला आहे. याविषयी सातत्याने चिंतन आणि सराव करून तो अधिक पुढे नेण्याची गरज आहे. शिक्षक बंधू आणि भगिनी यांना उपक्रमातील मुक्त सहविचार तसेच त्यातील चर्चेमध्ये बालसुलभ / वयानुरूप पध्दतीने मूल्यांविषयी मंथन अधिक परिणामकारक कसे करता येईल याविषयी अधिक सराव करण्यासाठी नेहमीच वाव राहणार आहे. केंद्रातील शिक्षक एकमेकांच्या मदतीने रोजचे अध्यापन करताना कोणत्या विषयात, कोणत्या ठिकाणी, सहयोगी अध्ययन पद्धती वापरता येतील याचे नियोजन करू शकतील. सुरुवातीला, इतर विषयांच्या अध्यापनात या पद्धतींचा आठवड्यातील काही तासिकांपुरता वापर करण्याचे व्यवहार्य धोरण केंद्रप्रमुख ठरवू शकतील. यामुळे वर्गात अनौपचारिक वातावरण निर्माण होऊन मुलांची अभिव्यक्ती व आनंद वाढायला मदत होईलच, पण शिक्षकांना देखील यातून आनंद मिळेल असे मला निश्चितपणे वाटते.

शिक्षक आणि अधिकारी यांनी एकत्र विचार आणि नियोजन करून हे घडवून आणले तर केवळ मूल्ये रुजण्यासाठीच नाही, तर इतर विषयांचे अध्ययन आनंददायी, कृतीशील आणि अनेक अध्ययन निष्पत्ती साध्य करणारे होईल असा विश्वास मला वाटतो. या दिशेने आपली सर्वांची वाटचाल व्हावी यासाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा !!

**श्रीमती वर्षाराणी भोपळे, उपविभाग प्रमुख, अभ्यासक्रम विकसन विभाग,**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे,**

### *या संवादपत्रात हे पहाल :*

मूल्यवर्धन विषयी बोलू काही १
श्री. शांतिलाल मुथ्था यांचा राज्यव्यापी दौरा १
अधिकारी वर्गाचे अभिप्राय २
शिक्षकांच्या नजरेतून ३
यशोगाथा ४
मूल्यवर्धन : पुढचे पाऊल ४
एस. एम. एफ. मास्टर ट्रेनरचे मनोगत ५
मूल्यवर्धन : शिक्षकांच्या दृष्टीतून ५
मूल्यवर्धन वार्ता ६
वृत्तपत्रांनी घेतलेली दखल ७
मान्यवरांचे अभिप्राय ८

## श्री. शांतिलाल मुथ्था यांचा राज्यव्यापी दौरा

मूल्यवर्धन कार्यक्रमाचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी शांतिलाल मुथ्था फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. शांतिलालजी मुथ्था जानेवारी २०२० ते मार्च २०२० या काळात प्रत्येक जिल्ह्यात मूल्यवर्धन मेळावे आयोजित करण्यासाठी राज्यव्यापी दौरा करणार आहेत.

मेळाव्यांची उद्दिष्टे:

१. मूल्यवर्धन कार्यक्रमातील आतापर्यंतच्या यशस्वी अनुभवांचा मागोवा घेणे.

२. स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प.,न.पा.,म.न.पा)चेशिक्षक,प्रेरक,मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शाळा निरीक्षक (म.न.पा.), विस्तार अधिकारी, तालुका नोडल अधिकारी, URC समन्वयक, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (म.न.पा.), शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा नोडल अधिकारी, साधन व्यक्ती, अधिव्याख्याता, ज्येष्ठ अधिव्याख्याता, प्राचार्य (DIET) यांनी केलेले अथक परिश्रम व त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये होत असलेले सकारात्मक परिवर्तन याची दखल राज्य शासन व एसएमएफच्या माध्यमातून घेणे.

३. शिक्षकांनी केलेली मेहनत, बनविलेली पोस्टर्स, व्हिडिओज, अनुभव कथन या सर्व महत्त्वाच्या बाबी सर्वसामान्य जनतेसमोर ठेवणे.




४. शिक्षक व प्रशासकीय यंत्रणा यांच्या मार्फत मूल्यवर्धनच्या अंमलबजावणीत सातत्य राखून त्याचे चळवळीत रूपांतर करण्याचा निर्धार करणे.

५. केंद्र शासनाच्या मानव संसाधन मंत्रालयाच्या माध्यमाने प्रत्येक राज्याकडून Performance Grading Index (PGI) भरून द्यावा लागतो. महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा.) च्या शाळांमध्ये मूल्यवर्धनसह इतरही अनेक चांगले प्रयोग व कामे सुरू आहेत. मूल्यवर्धनसंदर्भात शाळाभेटी, वर्गनिरीक्षण, पोस्टर्स बनविणे, अनुभव लेख लिहिणे, महत्त्वाचे राष्ट्रीय दिवस साजरे करणे, निबंध स्पर्धा घेणे, ECO क्लब बनविणे, युथ क्लब बनविणे, यशोगाथा सादर करणे अशा अनेक गोष्टी केल्या जातात. या सर्व गोष्टी पुराव्या व रिपोर्टसह योग्य पद्धतीने PGI मध्ये भरणे, जेणेकरून संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्य प्राथमिक शालेय शिक्षणात सर्वप्रथम येईल या दृष्टीने प्रयत्न करणे.

या दौऱ्याच्या निमित्ताने एकूणच शिक्षक, शासकीय यंत्रणा आणि मुलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मूल्यवर्धन अंतर्गत करण्यात आलेल्या कामाचे या निमित्ताने प्रदर्शन करण्याची संधी सर्वांना उपलब्ध होणार आहे. यासाठी सर्वजण जोमाने तयारीस लागले असून एकूणच चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

### डॉ. सुचिता आनंद पाटेकर, शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद परभणी



ज्याला मोल आहे त्याला मूल्य असं म्हणतात. वागण्यात किंमतीपेक्षा मूल्याची किंमत मोठी असते. जास्त असते. खरं तर त्याला किंमत हा शब्द वापरता येणार नाही. पण तरीही किंमत करणे म्हणजे त्याचे मोल समजणे या अर्थाने मूल्याचे मोल मोठे व जास्त आहे. मूल्ये रुजविली पाहिजेत असे आपण म्हणतो. जी गोष्ट रुजवायची ती शिकवता येणार नाही. शिकलेली गोष्ट वर वर राहते. मग रुजवायचं म्हटलं की ते आतून आपसूकच यायला हवं. त्यासाठी त्यांच रुजणं महत्वाचं! अन रुजायंच म्हटलं की त्याच मुरणं आलं. जे चांगल्या प्रकारे मुरतं ते आपोआपच आपल्यात दिसून येतं. एकदा का मूल्य मुरलं, रुजलं की ते तुमच्या वर्तणुकीतून, व्यवहारातून दिसू लागतं. अन ज्यावेळी ते असं व्यवहारात दिसतं त्यावेळी ते रुजलं असं म्हणता येतं. हे सगळं नैसर्गिकच रहायला हवं म्हणून आपण मूल्य शिकवत नाही तर रुजवितो.

कुटुंब, शाळा ही मूल्य रुजविण्याची महत्वाची दोन ठिकाणं! कुटुंबात सारं काही अनौपचारिकरीत्या घडतं. शाळेत मात्र काही बाबी जाणीवपूर्वक घडवून आणाव्या लागतात. मात्र आपण ते जाणीवपूर्वक करीत नसून आपोआपच होत आहे असे भासविण्याची काळजी शिक्षकाला घ्यावी लागते. उदाहरणच घ्यायचे झाल्यास शाळेच्या पटांगणात असलेला कचरा तुम्ही उचला आणि कचरा कुंडीत नेऊन टाका. तुमची ही छोटीशी कृती मुलं पाहतील अन बाकीचा कचरा उचलून कचराकुंडीतच टाकतील. तुम्ही एकदा केलेल्या या कृतींनं शाळेतील सर्वच मुले कचरा उचलायला लागतील असंही नव्हे! मात्र काही मुलांवर याचा परिणाम जरूर होईल. मुलं विशेषतः प्राथमिक शाळेतील मुलं ही फारच अनुकरणप्रिय असतात. जे शिक्षक टापटीप राहतात, आपल्या वस्तू नीटनेटक्या ठेवतात त्या वर्गातील मुलांमध्ये टापटीपपणा व नीटनेटकेपणा ही मूल्य रुजलेली आढळतात. ज्या शिक्षकांची अक्षरं चांगली, सुवाच्य असतात, त्या वर्गातील मुलांची अक्षरं चांगली असतात. तेव्हा मुलं अनुकरणातून आणि जाणीवपूर्वक केलेल्या कृतीतून शिकत असतात याच तत्त्वावर मुथ्था फाउंडेशन च्या माध्यमातून मूल्यवर्धन कार्यक्रम राबविला जात आहे. तो राज्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमधून सुरू आहे. तसेच गोवा व गुजरात राज्यातही हा कार्यक्रम सुरू झाला आहे.

शाळा हे संस्कारांचे केंद्र असून त्यातून देशाचे सुजाण व सूज्ञ नागरिक तयार व्हावेत यासाठी मूल्यवर्धन महत्त्वाचे असून मुलांमध्ये मूल्य जोपासना होण्यासाठी मार्गदर्शक उपक्रम, माहिती व कृती या कार्यक्रमांतर्गत दिल्या आहेत. त्या आपल्या वर्ग आणि शाळा स्तरावर राबवून मुलांचा सर्वांगीण विकास घडवून आणावा. हा वेगळा उपक्रम न मानता आपल्या दैनंदिन कार्याचा भाग मानून त्यास ओझे न मानता आणि तो पूर्ण करण्याची केवळ औपचारिकता न करता मूल्यं रुजलेली मुलं घडविण्यात आपण सारे मनापासून कार्य कराल या अपेक्षेसह सर्वांना शुभेच्छा देऊन थांबते. धन्यवाद!

### श्री. तानाजी आनंदा डावरे (जिल्हा समन्वयक), जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पालघर



मूल्यवर्धन – संस्कारक्षम शिक्षणाची नवी यशोगाथा

शिक्षण हा माणसाच्या विकासाचा मूलभूत पाया आहे. शाळेतील वातावरणात शिक्षण घेत असताना बालकाला उत्तम शिक्षण मिळावे व त्याचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शिक्षण व्यवस्थेमधील सर्व घटक मनापासून प्रयत्न करताना दिसतात. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे व शांतिलाल मुथ्था फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या रूपाने संस्कारक्षम व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नवी चळवळ सुरुझाली असून हे चित्र बदलत्या शिक्षणव्यवस्थेसाठी नक्कीच सुखदायी आहे. प्रत्येक मुलाला असे परिपूर्ण शिक्षण मिळावे हे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा –२००५ आपल्याला सांगतो. मात्र बदलत्या काळात, समाजात घडणाऱ्या नकारात्मक बाबी जर बघितल्या तर राज्यघटनेत दिलेली न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये बालकांमध्ये रुजत आहे का याचा कुठेतरी विचार व्हायला हवा. अशा सर्व प्रश्नांना व शंकांना मूल्यवर्धन कार्यक्रम सर्वच पातळ्यांवर न्याय देताना दिसत आहेत. काही ठिकाणी, मूल्यशिक्षण तासिका असताना हा कार्यक्रम खरंच गरजेचा आहे का? असेही विचारले गेले. मात्र एकंदरीतच या कार्यक्रमाचा ढाचा आपण बघितला तर संवेदनशील व जबाबदार नागरिक घडविणे हा मुख्य उद्देश डोळ्यांसमोर ठेवून तयार केलेला आहे. हा कार्यक्रम केवळ मूल्यांवरती न थांबता याच्याही पुढे गेलेला आपल्याला दिसतो. पालघर जिल्ह्यातील तलासरी तालुक्यात २०१६–१७ मध्ये हा कार्यक्रम राबविला गेला. २०१७–१८ मध्ये पालघर व वाडा तालुका आणि या वर्षी जिल्ह्यातील उर्वरित सर्व तालुक्यात हा कार्यक्रम राबविला जात आहे. इयत्ता पहिली पासून राज्यघटनेतील मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न, ज्ञानरचनावादावर आधारित बालस्नेही, आनंददायी, विद्यार्थिकेंद्रित शिक्षणपद्धतीचा वापर, नियोजित उपक्रम, शाळांच्या गरजा, प्राधान्यक्रम लक्षात घेऊन राबविता येणारा लवचिक असा कार्यक्रम अशी अनेक गुणवैशिष्ट्ये असणारा हा कार्यक्रम शाळांमध्ये, शिक्षकांमध्ये व पालकांमधेही अल्पावधीतच लोकप्रिय होताना दिसत आहे.

जि.प.शाळा कर्दळ ता. पालघर या ठिकाणी शाळेला भेट दिली असता उपक्रमांच्या निरीक्षणाबरोबरच या शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, पालक यांच्याशी संवाद साधण्याचा योग आला. आजूबाजूला इंग्रजी माध्यमाच्या शाळा असतानाही, या शाळेत तुम्ही मुले दाखल केली 'याचे नेमके कारण काय?'असा प्रश्न उपस्थितांना विचारल्यानंतर पालक व SMC सदस्य यांनी दिलेले उत्तर खूपच प्रेरणादायी व विचार करायला लावणारे होते. 'या शाळेत मुलांना शिक्षक मूल्यवर्धन शिकवितात, हे शिक्षण आम्हाला महागड्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा देऊशकत नाहीत. मुलांमध्ये खूप चांगले बदल घडलेले आम्हांला दिसत आहेत. स्वच्छता, नीटनेटकेपणा, मोठ्यांचा आदर, प्रामाणिकपणा, सहकार्य, मदत यांसारखे अनेक गुण आमच्या मुलांमध्ये आम्हांला प्रत्यक्षपणे दिसत आहेत', हे उद्गार होते या शाळेतील SMC व जवळपास २०–२५ पालकांचे. या सारखे यश दुसरे असू शकत नाही. आज जवळपास ३ वर्षांत या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीनंतर शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात आमूलाग्र बदल घडताना दिसत आहेत. राज्यघटनेतील मूल्ये, जीवनकौशल्ये, नैतिक मूल्ये मुलांमध्ये वाढीस लागताना दिसत आहेत. या कार्यक्रमामुळे शिक्षकांचे अध्यापन मनोरंजक पद्धतीने होताना दिसत आहे, विद्यार्थिकेंद्रित अध्यापनाचा वापर शिक्षक करताना दिसत आहेत. मुलांची शाळेतील उपस्थिती वाढण्यास मदत होत आहे. सहशालेय उपक्रमांतील मुलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शिवाय मूल्यवर्धन कार्यक्रम सर्व विषयांना जोडणारा दुवा असल्याने शिक्षकांना अध्यापन करताना याचा फायदा होताना दिसत आहे. बालकांच्या क्रिया–प्रतिक्रिया अधिकाधिक व्यक्त होताना दिसत आहेत.

यानंतर हा कार्यक्रम केवळ या बाबींपुरता मर्यादित न राहता खूप वेगाने वाटचाल करताना दिसत आहे. या वर्षी नव्याने सुरु झालेला 'मूल्यवर्धन प्लस–पुढचे पाऊल' हा तर बालकाच्या सर्वांगीण विकासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न करताना दिसत आहे. हा कार्यक्रम राबवीत असताना जिल्ह्यातील सर्व यंत्रणेने मनापासून हा कार्यक्रम राबवून यशस्वी केलेला आहे. या कार्यक्रमामुळे खऱ्या अर्थाने शाळेत शिकणारी देशाची भावी पिढी अधिक संस्कारक्षम,जबाबदार व परिपूर्ण बनण्यास अधिक मदत होत आहे. असा हा नावीन्यपूर्ण व उपयुक्त कार्यक्रम शाळांना दिल्याबद्दल शासनाला, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे व मुथ्था फाउंडेशनला मनापासून धन्यवाद !!

## मूल्यवर्धन- एक सुखद अनुभव

**श्रीमती सुवर्णा अशोक बोरगावकर**
जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा, कर्जाळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर



मूल्यवर्धन केंद्रस्तर प्रशिक्षण घेत असतानांच ठरविले की विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करावयाचा असल्यास मूल्यवर्धन उपक्रम वर्गात घ्यायचे व मूल्यसंस्कार घडवून आणायचे. मी मूल्यवर्धन उपक्रमांतून मुलांना घडवतेय व मुलेही आनंदाने घडत आहेत. माझ्याकडे इयत्ता पाहिलीचा वर्ग आहे. केंद्रस्तरीय मूल्यवर्धन प्रशिक्षणानंतर लगेच आठवड्यातील सोमवार, बुधवार व शुक्रवार हे तीन वार ठरवून तासिकांचे नियोजन केले. माझ्याकडे पहिलीचा वर्ग आहे. त्यामुळे मूल्यवर्धन या तासिकेचे, या सुंदर उपक्रमांचे एक सुंदर नियोजन तयार केले. नियोजनाप्रमाणे तासिकेत शिक्षक उपक्रम पुस्तिकेच्या सहाय्याने उपक्रम घेण्यास सुरुवात केली.

उपक्रमांतील विद्यार्थ्यांच्या सहभागातून लक्षात येऊ लागले की, विद्यार्थी मूल्ये जोपासत आहेत. विद्यार्थ्यांच्या वर्तनात विशेष बदल दिसत आहेत. पालकसभेत पालकांनी जेव्हा मुलांबद्दल, त्यांच्या वर्तणुकीबद्दल, झालेल्या बदलाबद्दल सांगितले तेव्हा योग्य संस्कार व मूल्ये रुजविण्यासाठी मूल्यवर्धन जरुरीचे आहे हे मनोमन पटले. मला असे वाटते की या उपक्रमांमध्ये मेनरोल आहे तो उपक्रम पुस्तिकेचाच. उपक्रम पुस्तिकांमध्ये इयत्तानुरूप असलेले सर्वच उपक्रम खूप सुंदर आहेत. प्रत्येक कृतीतून, प्रत्येक गाण्यातून, गोष्टीतून, उपक्रमांतून एक नवीन मूल्य विद्यार्थ्यांमध्ये जोपासलं जातं. मुलांना मूल्यांचा पाढा वाचून दाखववा लागत नाही, तर प्रत्येक कृतीतून मूल्य आपसूकच जोपासली जात आहेत.

मूल्यवर्धन प्रेरक म्हणून जबाबदारी पेलताना एक आव्हानच होते, पण मूल्यवर्धनमधील उपक्रमात मूल्यांचा संबंध हुशार मुलांशी लावणे योग्य नाही. उपक्रम एवढे सोपे आहेत पण मूल्ये लाख मोलाची. त्यामुळे प्रत्येक उपक्रमातून जे काही शिकायला मिळते ते विद्यार्थी पटकन सांगतात व तशी कृती करतात. शिवाय विद्यार्थी मूल्यवर्धन तासिकेची आतुरतेने वाट पाहतात.

मी मूल्यवर्धन वर्गउपक्रमात सातत्य टिकवून ठेवण्यासाठी व हे उपक्रम अखंड चालू ठेवण्यासाठी तासिकांचे नियोजन केले आहे. उपक्रमास पूरक योग्य साधने, शैक्षणिक साहित्याचा वापर त्यामुळे प्रत्येक तासिका १००% उद्दिष्टाप्रत पोहोचते. प्रत्येक उपक्रमातील मूल्ये १००% मुलांमध्ये रुजत आहेत. घेतलेले उपक्रम WhatsApp वरून व्हिडिओद्वारे व फोटोद्वारे इतरांपर्यंत व पालकांपर्यंत पोहचवले जातात.

मूल्यवर्धन उपक्रम या नावातच सर्वकाही आहे. प्रत्येकाजवळ उपजतच मूल्ये, संस्कार असतातच, पण त्यांना योग्य दिशा देणे, त्यांच्या संस्कारक्षम वागण्यातून मुलांमध्ये योग्य तो बदल होऊन त्याचा दैनंदिन जीवनात उपयोग करता येणे गरजेचे आहे. अगदी पहिली पासूनच जर उपक्रमांमधून अशी जीवनावश्यक मूल्ये घेतली तर संस्कारक्षम पिढी नक्कीच तयार होईल.

सन २०१७ पासून शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने 'मूल्यवर्धन' हा संस्कारी उपक्रम सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये सुरू केला, तेव्हा प्रत्येक विद्यार्थी घडू लागला, विद्यार्थी पुस्तिकेत दिलेले उपक्रम, बोधपर गोष्टी, गाणी यांतून व योग्य की अयोग्य, चांगले वर्तन, चित्रातील बोध असे अनेक उपक्रम घेतल्याने तसेच गोष्टीचे सादरीकरण प्रत्यक्ष वर्गात घेतल्याने मुलांना ही तासिका खूप आवडीची झाली आहे.

मूल्यवर्धन उपक्रमांमुळे मुलांच्या वागण्यात, बोलण्यात कमालीचा सकारात्मक बदल झाला. हा बदल साहजिकच पालकांच्या लक्षात आला. २०१९ च्या इयत्ता दुसरीच्या पालकसभेत पालकांनी मीटिंगमध्ये आवर्जून मूल्यवर्धन उपक्रमाचा विषय घेतला. शाळेत होणाऱ्या मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या आठवड्यातील तीन तासिका वाढविण्यासाठीचा आग्रह धरला. पहिली-दुसरीची मुलं दररोज घरातील मोठ्यांचा आशीर्वाद घेतात, वाईट बोलत नाहीत, योग्य अयोग्य काय? याचे धडे पालकांना देतात, स्वावलंबनातून घरातील छोट्या कामात पालकांची मदत करतात. हे सारे बदल केवळ मूल्यवर्धननेच झाले असे, आवर्जून सांगतात. ठसका लागल्यानंतर आजोबांना पाणी देणारा शुभम असो वा घराभोवतीचा परिसर मनापासून स्वच्छ करणारा नवीन असो, पालकांनी खूप खूप कौतुक करून या मूल्यवर्धन उपक्रमास शुभेच्छा दिल्या व मुथ्था फाउंडेशनला मनापासून धन्यवाद दिले.

मला मूल्यवर्धन राबवणाऱ्या महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांसाठी संदेश द्यावासा वाटतो. विद्यार्थ्यांना कृती देतांना, मूल्ये शिकवतांना शिक्षकांच्या विचार व आचारात आक्रमकता व सक्ती नसावी.

## मूल्यवर्धन : एक आश्वासक उपक्रम

**श्री. विशाल विनयेंद्र वैद्य, मूल्यवर्धन प्रेरक**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खांदला, केंद्र-किनखेड, ता. मूर्तिजापूर, जि. अकोला



मुलांमध्ये घटनात्मक मूल्ये शालेय जीवनात रुजायला हवीत, तसेच भविष्यात त्यांच्या मधून चांगले लोकशाहीभिमुख नागरिक घडायला हवेत. या उद्देशाने तयार केलेला मूल्यवर्धन कार्यक्रम अतिशय स्तुत्य आहे. शाळा व शिक्षक मूल्यवर्धनाच्या माध्यमातून हे उद्दिष्ट नियोजित, पद्धतशीर आणि नियमित रीतीने साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. मूल्यवर्धनमुळे या प्रयत्नांना बळकटी मिळत आहे. मूल्यवर्धन उपक्रमामुळे विद्यार्थी बोलके झाले, दिलेल्या विषयावर त्यांची मते मांडू लागले, जबाबदारी व विचारपूर्वक निर्णय घेऊ लागले, योग्य-अयोग्य वर्तन, खरे बोलण्याचे महत्त्व, सर्वांचा आदर करू लागले, पर्यावरण रक्षणाची जाणीव, सामाजिक हिताचा विचार, सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग, ई. गुण विद्यार्थ्यांत रुजण्यात मदत होत आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाज व शाळा हे एकमेकांच्या जवळ येत आहेत मूल्यवर्धन उपक्रमामुळे पालकांचा शाळेमध्ये सहभाग वाढला. यामुळे समाजाचे शाळेकडे लक्ष वेधण्यास मदत झाली.पालक उपक्रमाविषयी माहिती घेऊ लागले. पाल्यांत त्यांना सकारात्मक बदल दिसत आहे. मूल्यवर्धन उपक्रमांची इतर विषयांशी सांगड घातल्यामुळे विद्यार्थ्यांना उपक्रमाचे महत्त्व वाटू लागले. या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थी उपस्थिती वाढण्यात मदत झाली. सहयोगी अध्यापन पध्दतीमुळे उपक्रमाची वातावरण निर्मिती करण्यास मदत होत आहे. सर्वांनी या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी केली तर निश्चितच जबाबदार, चारित्र्यसंपन्न व लोकशाहीभिमुख समाज निर्माण होण्यास मदत होईल.

उज्ज्वल भविष्यासाठी उपक्रम राबवू या, त्यातून मूल्यवर्धन संकल्पपूर्ती करू या ।

## मूल्यवर्धनचा प्रेरणादायी अनुभव

**श्रीमती कल्पना देविदास माळी, मूल्यवर्धन प्रेरक**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, परसाडे केंद्र - डोंगर कठोरा, ता. यावल, जि. जळगाव



मूल्यवर्धन कार्यक्रम ही काळाची गरज आहे. मूल्ये ही शिकविली जात नाहीत तर ती रुजविली जातात. याची प्रचिती मूल्यवर्धन कार्यक्रमातील उपक्रमांमुळे आली. उपक्रमांची कार्यवाही पूर्ण होत असतानाच नकळतपणे मूल्ये विद्यार्थी आत्मसात करताना दिसू लागले. उदा. स्वयंशिस्त - वर्गनियम तयार करताना विद्यार्थी स्वतः सहभागी झाल्याने वर्गनियम परिणामकारक ठरले. मूल्यवर्धन उपक्रम हे प्रत्येक इयत्तेच्या अभ्यासक्रमास पूरक असल्याने मी दोघांची सांगड घातली. त्यामुळे वेळेची बचत तर झालीच; पण मनोरंजक खेळांच्या माध्यमातून शालेय घटक शिकविले गेल्यामुळे विद्यार्थ्यांचा प्रतिसाद उत्स्फूर्त होता. आनंदमयी वातावरणाची निर्मिती झाली.

मूल्यवर्धन उपक्रमातून अभ्यासक्रमातील घटक घेतल्याने अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सहज, सोपी, मनोरंजक, उत्साही व परिणामकारक झाली. या पद्धतीने विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड अधिक दिसून आली. सहयोगी खेळातून विद्यार्थी एकाग्र झाले हे दिसून आले. शिक्षक व विद्यार्थी यांच्यात जवळीक निर्माण झाली. मुले बोलकी झाली. स्वतःचे मत, विचार बोलीभाषेतून प्रकट करायला शिकू लागली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पारंपरिक पद्धतीने प्रश्न न विचारता विचारप्रवर्तक प्रश्नांचा वापर झाल्याने विद्यार्थी विचारमग्न होताना दिसून आले. विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयीची आवड, स्वयंशिस्त, स्व ची जाणीव, सहकार्यवृत्ती, एकाग्रता, आत्मविश्वास इत्यादी गुण वाढीस लागायला सुरुवात झाली.

मूल्ये रुजविणे यात शिक्षकांची भूमिका फार महत्त्वाची आहे. म्हणूनच सांगावेसे वाटते की, प्रत्येक शिक्षकाने आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी मूल्यवर्धन उपक्रम पुस्तिकेचा वापर अवश्य करावा त्यामुळे अध्यापनास योग्य दिशा मिळेल. त्यातूनच विद्यार्थ्यांमध्ये घडून आलेला बदल सद्यस्थिती बदलण्यास प्रेरक ठरेल. एक जबाबदार सुजाण नागरिक घडण्यास नक्कीच चालना मिळेल.

## यशोगाथा

# शाळेच्या ठिकाणी मूल्यवर्धनची 'प्रयोगशाळा', ग्रामस्थांनी बनविला बगीचा




सहा महिन्यांपूर्वी शाळेबाहेर जी जमीन रिकामी पडलेली होती, तिथे आता एक सुंदर बगीचा दिसतो. बगीचामध्ये गुलाब, जास्वंद, चंपा आणि चमेली अशा सुगंधी झाडांसोबत नारळाची फळांची झाडे देखील दृष्टीस पडतात. हे चित्र म्हणजे शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांच्या मेहनतीचे फळ आहे.

कोल्हापूर येथून ४० किलोमीटर दूर असणाऱ्या कागल ब्लॉक मधील वाळवे खुर्द येथील प्राथमिक शाळेची ही गोष्ट आहे. इथले मुख्याध्यापक रमेश कोळी सांगतात, की 'शाळेतील अभ्यासक्रमात पर्यावरण विषय तर शिकवला जातोच, परंतु मूल्यवर्धनमधून प्रेरणा घेऊन त्यांनी पहिल्यांदाच पर्यावरणाला मुद्द्यांना पुस्तकातून बाहेर काढले आणि त्यांना प्रत्यक्ष व्यवहारात आणले.

शाळेतील शिक्षक चंद्रकांत लोकरे यांनी सांगितले, की 'मूल्यवर्धनच्या काही उपक्रमांत झाड लावणे, झाड वाचविणे आणि झाडांच्या इतर उपयोगांविषयी सांगितलेले आहे. शाळेच्या बाहेरील मैदानावरील काही झाडांकडे बघून इथल्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या मनात विचार आला, की आपण असा एक बगीचा तयार करू शकतो ज्यामुळे शाळेची शोभा वाढेल. बगीचा लावण्यामागे एक वेगळे कारण देखील होते. मूल्यवर्धनच्या उपक्रमांत श्रमाचे महत्त्व सांगितले आहे, त्यामुळे आमची अशी इच्छा होती की विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व कळावे. यासाठी, आम्ही त्यांच्याकडून श्रम नाही करून घेतले, पण संपूर्ण कामाच्या वेळी त्यांना सोबत ठेवले. त्यामुळे ते बघतील की गावातील लोकांनी जमीन खोदून कशाप्रकारे दगड बाहेर काढले, खड्ड्यांमध्ये कशाप्रकारे खत आणि माती टाकली, कशाप्रकारे रोपे लावली आणि त्यांना पाणी घातले'.

१९२६ मध्ये स्थापित या मराठी माध्यमाच्या शाळेत पहिली ते चौथी पर्यंत एकूण १५० विद्यार्थी शिकतात. यामध्ये ८७ मुलं आणि ६३ मुली आहेत. या शाळेतील तीनही शिक्षकांनी मूल्यवर्धनचे प्रशिक्षण घेतले आहे. त्यांनी हे प्रशिक्षण या शाळेपासून ४५ किमी दूर असणाऱ्या कागल येथे घेतले.

शिक्षक उत्तम कांबळे यांनी मूल्यवर्धन प्रशिक्षणाच्या चार दिवसांच्या अनुभवाबद्दल सांगितले, की त्या वेळी त्यांना सांगितले गेले की विद्यार्थ्यांना शिकण्याच्या प्रक्रियेत कशाप्रकारे भागीदार बनवून घेतले जाऊ शकेल. ते म्हणाले, जेव्हा आम्ही मूल्यवर्धनचे वर्ग घ्यायला सुरुवात केली, तेव्हा आम्हांला वाटले की वृक्षारोपण देखील एक महत्त्वपूर्ण उपक्रम होऊ शकेल, जो पर्यावरणासाठी अनुकूल तर राहीलच आणि त्यामुळे विद्यार्थ्यांचा सहभाग देखील वाढेल.

शिक्षक रमेश यांच्या मते अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थी आणि शिक्षकांची श्रमाप्रती आस्था, वाढायला लागली आहे. त्यांनी सांगितले, 'आता बगीचा आहे तर आम्हांला विद्यार्थ्यांना हे सांगण्याची गरज पडत नाही, की बगीचा स्वच्छ ठेवा, झाडांना पाणी घाला, त्यात प्लॉस्टिकचा कचरा टाकू नका. म्हणजे बगीच्यामुळे विद्यार्थी बऱ्याच गोष्टी आपोआपच शिकत आहेत.'

शिक्षिका श्रावणी देवकर यांच्या मते अशा प्रकारच्या उपक्रमात सहभागी झाल्यानंतर त्या पर्यावरणाबद्दल आधीच्या तुलनेत अधिक जागरूक झाल्या. त्या म्हणाल्या, सुरुवातीला मी मूल्यवर्धनमुळे फार प्रभावित झाले नाही, पण ही बाग बनताना बघून मूल्यवर्धनबद्दलचा माझा विश्वास वाढत गेला.

शिक्षक उत्तम यांनी बागेबद्दलची एक आठवण सांगितली. ते म्हणाले, 'एक दिवस मूल्यवर्धनचा वर्ग होता, मी विद्यार्थ्यांना विचारले की आपण शाळेच्या बाहेर झाडे लावायाला पाहिजेत का? तर विद्यार्थ्यांनी मला विचारले, की त्यात कुठली कुठली झाडे लावायला हवीत? मी त्यांना काही झाडांची नावे सांगितली, तर त्यांनी विचारले, की कुठल्या झाडाचे काय फायदे आहेत. मी त्यांना काही झाडांचे फायदे सांगितले. अशा प्रकारे आम्ही बरीच माहिती मिळविली आणि समजून घेतली'.

तिसरीमध्ये शिकणारी समृद्धी पाटील म्हणाली, की शाळेतील बागेत झाड लावण्यासाठी तिच्या वडिलांनी तिला मोगऱ्याचे रोप दिले होते. अशा प्रकारे सर्वच विद्यार्थ्यांनी आपापल्या घरून रोपे आणली. चौथीमध्ये शिकणारी गायत्री गोसावी म्हणाली, जेव्हा आम्हांला सांगितले, की 'आजूबाजूच्या कुठल्याच शाळेत आमच्या सारखी बाग नाही तेव्हा आम्हांला खूप आनंद झाला. आमची बाग बघून इथे येणारे लोक देखील आनंदित होतात. तिसरीची श्रावणी घोडके म्हणाली, की 'पहिल्यांदा चप्पल-बुटांचे स्टँड बागेत ठेवलेले असायचे. मग एक दिवस विद्यार्थ्यांनी मिळून ठरविले की ते बागेपासून दूर ठेवायचे. आता चप्पल-बूट बागेत पसरलेले दिसत नाहीत'.

चंद्रकांत या बागेला मूल्यवर्धनचा परिणाम मानतात. हे समजावून सांगताना त्यांनी सांगितले, 'या बगीच्यामुळे विद्यार्थी पाण्याचा योग्य वापर करायला शिकत आहेत. सार्वजनिक ठिकाणी वर्तणूक कशी असायला हवी हे शिकत आहेत. याच गोष्टी त्यांना मूल्यवर्धनच्या इतर उपक्रमांत देखील सांगितलेल्या आहेत. अशा प्रकारे, या बागेने त्यांना आपापल्या जबाबदारीची जाणीव करून दिली आहे.'

रमेश म्हणाले, 'पर्यावरण विषय शिकणे आणि त्याप्रती आवड निर्माण करणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. आम्ही या बागेच्या निमित्ताने या दोन्ही गोष्टी जोडून टाकल्या'. उत्तम यांनी सांगितले, 'आता आम्ही ही बाग अजून मोठी करणार आहोत. यासाठी एक परिसर तयार करून त्याला कुंपण घाण्याचा विचार आहे. मग आम्ही तिथे बरीच झाडे लावू'.

शेवटी श्रावणी म्हणाली, 'बागेला आणखी सुंदर बनविण्यासाठी आम्हांला गावकऱ्यांची साथ मिळाली आहे. या कामासाठी ते श्रमदान करणार आहेत. सोबतच ते पैसे देखील जमा करणार आहेत'.

## मूल्यवर्धन : पुढचे पाऊल

### मुख्याध्यापकांचे तीन दिवसीय प्रशिक्षण

मुख्याध्यापकांचे तीन दिवसीय प्रशिक्षण माणगाव व सावंतवाडी या तालुक्यात घेण्यात आले. हा कार्यक्रम दोन्ही तालुक्यात प्रत्येकी ४ केंद्रांत राबविण्यात येणार आहे. दोन्ही ठिकाणी चारही केंद्रांतील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांतील मुख्याध्यापकांसाठी हे प्रशिक्षण आयोजित केले होते.

प्रशिक्षणामध्ये मूल्याधिष्ठित कार्यपद्धती कशी राबवावी याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. संपूर्ण शाळा मूल्याधिष्ठित व्हावी यासाठी मुख्याध्यापकांची भूमिका नेमकी कशी असावी याचे मार्गदर्शन केले गेले. शाळेतील सर्व घटक यामध्ये कसे सहभागी होऊ शकतील याचे विवेचन 'समग्र शाळा दृष्टिकोन' या अंतर्गत करण्यात आले.

तीन दिवसीय प्रशिक्षणामध्ये अनेक गटकार्ये, जोडीकार्ये याद्वारे खेळीमेळीच्या पद्धतीने मुख्याध्यापकांनी नवीन गोष्टी शिकून घेतल्या. शेवटच्या टप्प्यात मूल्यवर्धनचे मोबाईल ॲप या कार्यक्रमात कसे महत्त्वपूर्ण आहे, यांची माहिती व प्रत्यक्ष वापर करण्याचा सराव करून घेण्यात आला.

शांतिलाल मुथ्था फाउंडेशनतर्फे २ मास्टर ट्रेनर व १ तालुका समन्वयक पूर्णवेळ प्रशिक्षणाला उपस्थित होते. प्रशिक्षणामध्ये शासकीय अधिकारी देखील गरजेनुसार अंशकाळ उपस्थित होते. सर्वांनी शालेय कार्यवाही मूल्याधिष्ठित होण्याच्या हेतूने सर्व मुख्याध्यापकांना मार्गदर्शन करून प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रेरित केले.

### शिक्षकांशी संवाद

हा कार्यक्रम जून महिन्यापासून महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांतील प्रत्येकी एका तालुक्यात, असा २५ तालुक्यांत राबवायला सुरुवात झाली आहे. पहिल्या सत्रात शासकीय अधिकाऱ्यांची प्रशिक्षणे, मुख्याध्यापक व शिक्षकांची प्रशिक्षणे यावर भर दिला गेला. प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रभावी व्हावी यावर अधिक लक्ष दिले गेले. त्याचाच एक भाग म्हणून फाउंडेशनचे काही प्रोग्रॅम ऑफिसर व वरिष्ठ अधिकारी यांनी महाराष्ट्र दौरा केला. हे सर्व निवडलेल्या प्रत्येक तालुक्यात जाऊन चारही केंद्रांतील जास्तीत जास्त शाळांना प्रत्यक्ष भेट देत होते. शाळांना भेट देताना त्या तालुक्यातील विषय साधन व्यक्ती व केंद्रप्रमुख यांची मदत घेतली गेली.

मूल्यवर्धन उपक्रम आणि समग्र शाळा दृष्टिकोन याबाबत शाळांनी काय काय केले आहे याची माहिती घेतली गेली. वर्गनिरीक्षण केल्यावर शाळेतील सर्व शिक्षकांची एक छोटी बैठक घेऊन निरीक्षणात आढळलेल्या महत्त्वाच्या बाबींवर चर्चा केली गेली. त्यात जमेच्या बाजू व सुधारणेच्या जागा या बाबींवर चर्चा केली गेली. 'शिक्षक उपक्रम पुस्तिका' या पुस्तिकेचा वापर कसा करावा व त्याचा 'विद्यार्थी उपक्रम पुस्तिकेशी' कसा संबंध आहे हे प्रामुख्याने सांगितले गेले. काही ठिकाणी गटशिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुख यांच्यासह एकत्रित बैठक घेऊन त्यात संपूर्ण तालुक्याचा आढावा सादर करण्यात आला व पुढील काळासाठीचे धोरण आखून त्यात प्रत्येकाचे योगदान कसे असेल याचे नियोजन केले गेले.

## एस. एम. एफ. मास्टर ट्रेनरचे मनोगत

### मूल्यवर्धन : एक सुसंस्कारी माणूस घडविणारा कार्यक्रम

**श्री. सखाराम वाघुम्ब्रे**
प्रशिक्षक आणि जिल्हा समन्वयक, पालघर



मला मूल्यवर्धन कार्यक्रमामध्ये काम करण्याची संधी सन २०१० मध्ये मिळाली. माणूस घडविण्याच्या क्षेत्रात काम करण्याचं भाग्य मला या निमित्तानं लाभल. या दरम्यान वेगवेगळ्या प्रशिक्षणांतून एक मूल्यांचा अनुभव विद्यार्थ्यांना देणारा शिक्षक म्हणून मी तयार झालो. २०१० ते २०१६ पर्यंत मूल्यशिक्षक म्हणून काम करत असताना आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडण्याचा प्रयत्न केला. सन २०१६ मध्ये संस्थेने मला एक मूल्यवर्धन प्रशिक्षक म्हणून भूमिका पार पाडण्याची संधी दिली. यापूर्वीची भूमिका अन् या भूमिकेत खूप आव्हाने आहेत याची जाणीव पहिल्यांदाच शिक्षकांसमोर उभे राहिल्यानंतर झाली. परंतु इथे काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने दिलेला आत्मविश्वास आव्हाने पेलण्याची ताकत देऊन गेला. मूल्यवर्धन प्रशिक्षण देण्याच्या निमित्ताने बालसंस्कार हा विषय समोर आला आणि बालपणी शाळेच्या प्रार्थनेत गायल्या जाणाऱ्या काही ओळी डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या,

> **तेजस स्पर्शाने दूर होईल अंधार,**
> **जैसा मुळांचा वृक्षास असे आधार,**
> **शिल्पास आकार जैसा शिल्पकार,**
> **मना घडवी संस्कार, मना घडवी संस्कार**

असं म्हटलं जांत की, प्रत्येक व्यक्तीचं व्यक्तिमत्व हे त्याच्या बालपणीच्या संस्कारांचं प्रतिनिधित्व करीत असतं, म्हणजेच पेरलं तस उगवतं, रुजवलं तस रुजतं, अन असतं तसं दिसतं, पण आजच्या पिढीकडे बघताना अस जाणवतं की, कोणत्यातरी उणीव आहे अन ती उणीव कोणती आहे तर ती आहे, मूल्यसंस्कारांची.

मूल्यवर्धन प्रशिक्षणाच्या निमित्ताने सबंध महाराष्ट्रभर कार्यशाळा घेत असताना प्रत्येक सहभागी घटकाच्या बोलण्यातून ही उणिवेची व्यक्त जाणवत होती. मुलांच्या वर्तनाला योग्य वळण कसे लावावे? मुलांमध्ये सकारात्मक शिस्त कशी रुजवावी? असे अनेक प्रश्न शिक्षक, पालकांच्या समोर उभे राहिले आहेत. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मूल्यवर्धन हा पर्याय शाळांना, शिक्षकांना, पालकांना अतिशय योग्य आहे याची जाणीव होऊ लागली आहे. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी शिक्षकांच्या बोलण्यातून जी भावना या कार्यक्रमाविषयी व्यक्त होते ती खूप बोलकी असते. एक प्रकारची समाधानाची भावना, नवा प्रकाशाचा मार्ग मिळाल्याची जाणीव शिक्षकांना होते.

मूल्यवर्धन प्रशिक्षणाच्या निमित्ताने मला महाराष्ट्रातील हजारो शिक्षक, मुख्याध्यापक, पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. शाळांना, शिक्षकांना मूल्यशिक्षणाच्या संदर्भात काही ठोस पर्याय आहेत याची जाणीव करू देऊ शकलो. या मूल्यवर्धन कार्यशाळेतील अनुभव हे खूप मजेदार आहेत. परत एकदा मूल होऊन शिकण्याची संधी या निमित्ताने मिळाली असे जेव्हा एखादे शिक्षक सांगतात तेव्हा त्यांना त्यांचे बालपण मिळवून देणारा हा कार्यक्रम वाटतो. वेगवेगळ्या कृतीद्वारे हे प्रशिक्षण होत असल्याने यात काहीतरी वेगळेपण आहे याची जाणीव शिक्षकांना होऊ लागते, कार्यशाळा ज्या विषयावर आहे, त्या संवैधानिक मूल्यांची जाणीव / अनुभव प्रत्यक्ष मिळत आहे, याची जाणीव शिक्षकांना होते. मूल्य ही सांगून रुजत नाहीत तर ती प्रत्यक्ष अनुभवातून रुजतात. कुठल्याही प्रकारचा धाक, दडपण शिकणाऱ्यालच्या मनात नसे त्यामुळे शिकणे हे चिरकाल टिकते याची जाणीव व अनुभव प्रत्यक्ष कार्यशाळेत मिळतो, अन् हाच अनुभव अन् हीच जाणीव मनात रुजवून शिक्षक जेव्हा आपआपल्या शाळेत जातात तेव्हा ते अशाच प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. शिक्षक सांगतात, की मूल्यवर्धन उपक्रम विद्यार्थ्यांबरोबर घेतल्याने मुले आत्मविश्वासाने बोलू लागली आहेत. मुले आपल्या चुका प्रामाणिकपणे कबुल करतात. मोकळेपणाने एकमेकांशी संवाद साधतात. एखादी कृती करण्यापूर्वी विचारपूर्वक निर्णय घेतात, तेव्हा आपण एक प्रशिक्षक म्हणून मूल्यवर्धन संकल्पना शिक्षकांपर्यंत चांगल्याप्रकारे पोहचवू शकलो याचे समाधान मिळते. हीच मी माझ्या कामाची पावती समजतो.

धन्यवाद.

## मूल्यवर्धन : शिक्षकांच्या दृष्टीतून

### माणसाला माणसाशी जोडतो

बंधुतेची बाग आम्ही फुलवितो नी सजवितो
सहयोग साधुन माणसाला माणसाशी जोडतो
कितिक राज्ये धर्म, भाषा, वेष, बसती संगती
बहुरंगी साज मिरवी अंगावरी ही संस्कृती
विविधतेचे इंद्रधनुष सांभाळुया आम्ही सांगतो
सहयोग साधुन माणसाला माणसाशी जोडतो ॥१॥

वाद अन प्रतिवाद होता, संतापती कटू बोलती
नाती गोती विसरुनी ती, एकमेका टाळती
संवाद करतो, जवळ येतो मनभेद आम्ही मिटवतो
सहयोग साधुन माणसाला माणसाशी जोडतो ॥२॥

न्याय, समता, प्यारी आम्हा स्वातंत्र्य आणि बंधुता
मंत्र हा सहजीवनाचा ठेविला नित जागता
बालहृदयी स्वप्न अमुचे पेरतो अन रुजवितो
सहयोग साधुन माणसाला माणसाशी जोडतो ॥३॥

अमर मूल्यांची सदोदित ज्योत आम्ही धरली करी
विश्व सारे उजळूदे आकांक्षा वसते उरी
थांबणे नाही आता, निर्धार सतत सांगतो
सहयोग साधुन माणसाला माणसाशी जोडतो ॥४॥

**श्री. विद्याधर शुक्ल**
निवृत्त उपसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे



### जीवन घडविणारे मूल्यवर्धन

अंगीकार करू या जीवन अपुले मूल्यवर्धनाला
चला मुलांनो गोळा होऊनी जाऊ शाळेला
संस्काराचे मोती मिळवून धन्य आम्ही झालो
विश्व एकता प्रेम बंधुता नातेही जपलो
मित्रत्वाचे नाते जपले सांगू जगताला...चला मुलांनो

वर्गनियम ते आम्ही बनविले, नाही तोडणार
नवीन संदेश शांततेचा, आम्ही जपणार
मजबूत करू या शिस्त, समृद्धी आणि एकतेला...चला मुलांनो
नवी प्रेरणा नवी दिशा नवी संकल्पना
सुसंगती सदा ही लाभो आमच्या या जीवना
जीवनमूल्य रुजवीत जाऊ आज या घडीला...चला मुलांनो

स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता घटनेने दिधले
हे मूल्य रुजविण्यासाठी शाळेमध्ये शिक्षक ही वदले
शब्द तयांचे अंगीकारून घडवू जीवनाला
चला मुलांनो...

**श्री. शंकर बोरकर (माजी केंद्रप्रमुख)**
केंद्र-डोंगरगाव, ता. आरमोरी, जि. गडचिरोली



## गिरीश कुलकर्णी यांची मूल्यवर्धन कार्यक्रम राबविणाऱ्या शाळांना भेट



प्रसिद्ध मराठी सिने अभिनेते श्री. गिरीश कुलकर्णी यांनी मूल्यवर्धन कार्यक्रम जाणून घेण्यासाठी मूल्यवर्धन उपक्रम राबविणाऱ्या जि.प.प्रा.शा.खंडाळा, ता. खंडाळा जि. सातारा आणि जि.प.प्रा.शा. उत्रौली, ता. भोर, जि. पुणे या दोन शाळांना दिनांक १० ऑक्टोबर २०१९ रोजी भेट दिली. यावेळी त्यांनी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक यांच्याबरोबर मूल्यवर्धन संदर्भात चर्चा केली. शिक्षकांनी त्यांचे मूल्यवर्धन विषयक अनुभव, मूल्यवर्धनच्या पद्धती सांगत मोकळेपणाने श्री. गिरीश कुलकर्णी यांच्याशी संवाद साधला. शिक्षकांनी मूल्यवर्धनच्या एका उपक्रमाचे प्रात्यक्षिक देखील यावेळी सादर केले. गिरीश कुलकर्णी यांनी उपक्रमातील बारकावे टिपून घेतले. भेटी दरम्यान विद्यार्थ्यांबरोबर उपक्रम कसे आयोजित केले जातात, त्यामध्ये विविध रचनांचा वापर कशाप्रकारे केला जातो, सहयोगी खेळ कसे आयोजित केले जातात, ते मुलांना आवडतात का, मुलांमध्ये परिवर्तन कसे घडते हे सर्व प्रत्यक्ष पाहण्यास मिळाले म्हणून श्री. गिरीश कुलकर्णी यांनी या भेटीबद्दल समाधान व्यक्त केले.

## जलशक्ती मंत्री मा. श्री. गजेंद्रसिंह शेखावत यांनी जाणून घेतले एस.एम.एफ.चे विविध कार्यक्रम



नव्याने स्थापित जलशक्ती मंत्रालयाचे मंत्री मा. श्री. गजेंद्रसिंह शेखावत यांच्या समोर गुरुवार, दिनांक १७ सप्टेंबर २०१९ रोजी मा. श्री. शांतिलालजी मुथ्था यांनी मूल्यवर्धन कार्यक्रमाचे सादरीकरण केले. यावेळी श्री. परमेश्वरन अय्यर, सचिव, पेयजल व स्वच्छता विभाग; श्री. यु. पी. सिंह, सचिव, जल संसाधन विभाग; श्री. भरत लाल, सहसचिव, पेयजल व स्वच्छता विभाग; डॉ. जोसेफ इमॅन्युएल, संचालक (शैक्षणिक), सी.बी.एस.ई. हे देखील उपस्थित होते. या वेळी श्री. शांतिलालजी मुथ्था यांनी मूल्यवर्धन कार्यक्रमाची वैशिष्ट्ये, यशस्विता आणि मूल्यवर्धनचे परिणाम यांविषयी सविस्तर मांडणी केली. बैठकीमध्ये मुख्यतः मूल्यवर्धनच्या वाहतूक व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि पाण्याविषयी जागरूकता यांवर आधारित कृतियुक्त उपक्रमांची चर्चा करण्यात आली.

मा. मंत्री आणि त्यांच्या गटाने या कार्यक्रमाबद्दल उत्सुकतेने माहिती घेतली आणि राष्ट्रीय पातळीवर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या व्यवहार्यतेची चर्चा देखील केली.

## मूल्यवर्धन इयत्ता सहावीच्या पथदर्शी प्रकल्पासाठी शिक्षक प्रशिक्षण संपन्न



महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण क्षेत्रातील मागील काही वर्षांच्या कामगिरीचा आलेख मांडताना त्यात मूल्यवर्धनचा ठळकपणे उल्लेख करण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारद्वारे मूल्यवर्धन कार्यक्रमांतर्गत इयत्ता सहावीसाठी शैक्षणिक साहित्याची निर्मिती करण्यात आलेली आहे. इयत्ता सहावीसाठी मूल्यवर्धनचा पथदर्शी प्रकल्प नुकताच सुरू करण्यात आलेला आहे. या अंतर्गत पुरंदर, खंडाळा आणि भोर या तीन तालुक्यांतील सहावीच्या शिक्षकांचे तीन दिवसीय प्रशिक्षण दिनांक १४ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०१९ आणि दिनांक १८ ते २० नोव्हेंबर २०१९ या काळात वाघोली येथे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी अनुक्रमे ३८ व १९ शिक्षक उपस्थित होते.

यावेळी मूल्यवर्धन अंतर्गत वापरल्या जाणाऱ्या अध्ययन पद्धतींची माहिती, या अध्ययन पद्धती शाळेतील इतर विषयांमध्ये कशा वापरता येतील, मूल्यवर्धनच्या कार्यपद्धती, शिक्षक उपक्रम पुस्तिकेचा वापर यांविषयी सखोल चर्चा करण्यात आली.

## अमेरिकी शिक्षक आणि शिक्षणतज्ञांच्या गटाची एसएमएफला भेट



मूल्यवर्धन कार्यक्रमाविषयी सखोल माहिती मिळविण्यासाठी अमेरिकेच्या शिक्षक आणि शिक्षणतज्ञांच्या गटाने शांतिलाल मुथ्था फाउंडेशनच्या पुणे येथील मुख्य कार्यालयास दिनांक २७ जुलै २०१९ रोजी भेट दिली. दिल्ली येथील इंटरनॅशनल स्कूल फॉर जैन स्टडीज (ISJS) द्वारे आयोजित केला जाणारा अहिंसेवरील कोर्स पूर्ण करण्यासाठी हा गट भारतात आला होता.

या प्रकारचा कोर्स ISJS द्वारे प्रत्येक वर्षी आयोजित केला जातो ज्याची सत्रे भारतातील विविध ठिकाणी पार पडतात. मागील ५ वर्षांच्या कालावधीत जगभरातून आलेल्या सहभागींनी मूल्यवर्धनविषयी अधिक जाणून घेण्यासाठी एसएमएफला भेट दिली आहे.

## गुजरात मूल्यवर्धन प्रेरक कार्यशाळा



महाराष्ट्र आणि गोव्यानंतर आता मूल्यवर्धन कार्यक्रम २ ऑक्टोबर २०१९ रोजी गुजरात राज्यात सुरु झालेला आहे. गुजरातमधील मूल्यवर्धन कार्यक्रम प्रायोगिक प्रकल्पाची सुरवात राष्ट्रपिता महात्मा गांधीजीच्या जन्म गावातून म्हणजेच पोरबंदर या जिल्ह्यातून करण्यात आली आहे. या कार्यक्रमाची खऱ्या अर्थाने वर्गावर्गात सुरुवात करण्यासाठी दिनांक १८ ते २१ डिसेंबर रोजी पोरबंदर जिल्ह्यातील पोरबंदर, रानावाव, कुतीयाना या तीन तालुक्यातून १०० शिक्षक व केंद्रप्रमुख यांचे प्रेरक प्रशिक्षण घेण्यात आले. हे प्रशिक्षण DIET, पोरबंदर या कार्यालयात पार पडले. प्रशिक्षणात शिक्षकांनी मूल्यवर्धन वर्गव्यवस्थापन, सहयोगी अध्ययन पद्धती, मूल्यवर्धन कौशल्ये, अध्ययन सामुग्रीचा परिचय, मूल्यवर्धन तंत्रे या संदर्भातील शिक्षक व केंद्रप्रमुख यांच्या संकल्पना स्पष्ट करण्यात आल्या. या प्रशिक्षणासाठी श्री. नितीन दलवाडे (नोडल अधिकारी, GSCERT), श्री. अल्ताफ राठोड (प्राचार्य, DIET, पोरबंदर), श्री. यु.डी.मेहता (जेष्ठ अधिव्याख्याता, DIET, पोरबंदर) श्री. व्यंकट रमणा (CEO, शांतीलाल मुथ्था फाउंडेशन, पुणे) श्रीमती मिनल दशपुत्रे (प्रोग्रॅम डायरेक्टर, शांतीलाल मुथ्था फाउंडेशन, पुणे) यांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.

## मूल्यवर्धन : एक आनंदयात्रा



"Values are like fingerprints. Nobodie's are the same but you leave them all over everything you do."

महाराष्ट्र शासन आणि शांतिलाल मुथ्था फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात मूल्यवर्धन कार्यक्रमाची कार्यवाही राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (जि.प, न.पा, म.न.पा) शाळांमध्ये सुरु आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील पथदर्शी मूल्यवर्धन कार्यक्रम महाराष्ट्र राज्याच्या सर्व तालुक्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये या कार्यक्रमामुळे संविधानातील मूल्ये बालस्नेही आणि कृतीशील रीतीने पोहोचत आहेत ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे.

महाराष्ट्र शासन आणि शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने एकत्रितपणे शाळा/वर्गभेटी, मूल्यवर्धन-App यांच्या सहाय्याने सातत्याने या कार्यक्रमाचा मागोवा घेत आहे. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि मा. शिक्षण मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांनी वेळोवेळी या कार्यक्रमाचा आढावा घेऊन या कार्यक्रमाला दिशा दिली आहे. मी स्वतः अनेक शाळांमध्ये भेटी देऊन वर्गात मूल्यवर्धन उपक्रम कसे आयोजित केले जातात हे पहिले आहे. शिक्षक आणि अधिकारी यांची मतेही जाणून घेतली आहेत. मूल्यवर्धन कार्यक्रमातून अनौपचारिक दडपणमुक्त वातावरणात सहयोगी अध्ययन, मूल्यांची जाणीव विकसित करणारी चर्चा, यातून परस्पर आस्था, सामजिक भावना तयार होऊन लोकशाही मूल्ये हळू हळू रुजताना दिसत आहेत. मूल्यवर्धन उपक्रम हाताळताना मुलांना सतत उत्तेजन देऊन सहयोगातून विधायक सृजनशील विचार आणि कृती करायला लावणारी पद्धती, इतर विषयांसाठी देखील उपयोगी असल्याचा शिक्षकांचा अभिप्राय आहे. काही शिक्षकांनी स्वतःच्या कल्पकतेने समांतर असे नाविन्यपूर्ण उपक्रमही तयार केले आहेत.

हे उत्साहाचे वातावरण असेच टिकून राहावे यासाठी शिक्षक आणि अधिकारी बंधू भगिनी या कार्यक्रमाचे महत्व ओळखून प्रामणिकपणे जे विशेष प्रयत्न करीत आहेत ते एकमेकांना माहिती होणे आवश्यक आहे. मूल्यवर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी यापुढे अशीच उत्साहाने करण्यासाठी सर्व शिक्षक आणि अधिकारी यांना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

**श्रीमती पूनम घुले, अधिव्याख्याता, अभ्यासक्रम विकसन विभाग,**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे**



TATA TRUSTS

शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन, ८ वा मजला, मुथ्था चेंबर्स -२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११०१६.
**फोन नं.: ०२० ६६०५००००** | info@mutthafoundation.org | www.mutthafoundation.org